Loksatta January 21, 2015 Pp. 5





घुमान साहित्य संमेलन संयोजन समितीतर्फे शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते साहित्य अकादमी पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. जयंत नारळीकर यांचा मंगळवारी सत्कार करण्यात आला. संजय नहार, डॉ. मंगला नारळीकर, डॉ. माधवी वैद्य आणि भारत देसडला या वेळी उपस्थित होते.

# विज्ञानकथा लिहिणे सोपे काम नाही- नारळीकर

**प्रतिनिधी, पुणे**

**वैज्ञानिक निबंधाचे** लेखन करणे हे तुलनेने सोपे असते. पण, विज्ञान म्हणजे समजायला कठीण, हा पूर्वग्रह दूर ठेवत वाचता वाचता वाचकाला सहजगत्या लेखनामागचे विज्ञान समजेल अशी विज्ञानकथा लिहिणे सोपे काम नाही, अशी भावना ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी मंगळवारी व्यक्त केली. आजच्या कल्पित विज्ञानकथा या उद्या वास्तवामध्ये येऊ शकतात. याचे भान ठेवून लेखन करणे महत्त्वाचे ठरते, असेही ते म्हणाले.

घुमान येथे होणाऱ्या साहित्य संमेलनाच्या संयोजन समितीतर्फे शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते साहित्य अकादमी पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. जयंत नारळीकर यांचा सत्कार करण्यात आला. त्या प्रसंगी 'माझे विज्ञानकथा विश्व' या विषयावर नारळीकर बोलत होते. डॉ. मंगला नारळीकर, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. माधवी वैद्य, संमेलनाचे स्वागताध्यक्ष भारत देसडला आणि सरहद संस्थेचे संजय नहार या वेळी उपस्थित होते.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाने लावलेले नवे शोध पचवायला जातो आणि त्यामध्ये आपण फसतो. काही शोधांचे न सोसणारे बाजूचे परिणाम होत असतात. या विषयीचा सारासार विचार न करता आपण विज्ञानाला प्रवेश देतो. प्लॅस्टिक हा जीवनावर नियंत्रण ठेवणारा घटक झाला आहे. त्यामुळे प्लॅस्टिकवर विजय मिळविणाऱ्याचा सत्कार केला पाहिजे. ॲटमबॉम्ब झाला नसता तर बरे झाले असते असे वाटते, या गोष्टींकडे लक्ष वेधून नारळीकर म्हणाले, जनसामान्यांना विज्ञानाची माहिती देणारे लेखन करणारे माझे गुरु फ्रेड हॉल यांना आलेला अनुभव गाठीशी असल्यामुळे मी विज्ञानकथालेखन करण्याकडे वळालो. माझ्या पहिल्याच कथेचे दुर्गा भागवत यांनी कौतुक केल्यामुळे उत्साह दुणावला. पूर्वी लिहिलेल्या सायन्स फिक्शन म्हणजेच कल्पित विज्ञानकथा आता वास्तवामध्ये आल्या आहेत. भयकथा, परीकथा या नावाने येणाऱ्या आणि वेगळेपण म्हणून प्रस्थापित विज्ञानाला धक्का देत केलेले लेखन हे वाईट साहित्य असते. हे आपल्यापेक्षाही परदेशामध्ये अधिक आहे. मात्र, लेखनामागची भूमिका समजावून न घेता टीका करणाऱ्या समीक्षकांचीच विज्ञान कथालेखनासंदर्भात कार्यशाळा घेण्याची आवश्यकता आहे.

बाबासाहेब पुरंदरे म्हणाले, ''विज्ञानामध्ये शून्य असल्यामुळेच इंग्रज भारतावर एवढी वर्षे राज्य करू शकले. स्वातंत्र्योत्तर काळात विज्ञानामध्ये प्रगती केली असली तरी अजूनही आपली पावले अज्ञानाच्या दिशेनेच जात आहेत. हे अज्ञान दूर करण्याचे काम नारळीकर करीत आहेत. संशोधनाद्वारे नवनिर्मिती करण्यापेक्षाही आम्ही बाहेरच्या गोष्टी येथे आणून जुळणी करण्यामध्येच धन्यता मानतो.'' डॉ. माधवी वैद्य यांनी मनोगत व्यक्त केले. भारत देसडला यांनी प्रास्ताविक केले. मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.